<u>**विशेष दरखास्त क्र. ३३/२०२२ मध्ये निशाणी २२ खाली आदेश**</u>

(श्रीनिवास जोशी (मयत) वारस वि. उपमुख्य अभियंता, मध्य रेल्वे, पुणे व इतर)

**[CNR No.MHSO12-001778-2012 ]**

दरखास्तादाराने/धनकोने सदरचा अर्ज मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ऋणको यानी या न्यायालयात जमा केलेली रक्कम धनकोला अदा करणेबाबत दिलेला आहे. धनकोच्या कथनानुसार मा. मुंबई उच्च न्यायालयाने प्रथम अपिल क्र. ३२७९२/२०२३ मधील दिनांक २४/०१/२०२५ रोजीच्या आदेशातील कलम ५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे धनकोला जमा रक्कम उचलण्याची मुभा दिलेली आहे.

2. ऋणकोतर्फे सदर अर्जास नि.क्र. २४ अन्वये जवाब देवून हरकत घेतली आहे की, मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या वर नमुद आदेशातील कलम ५ प्रमाणे रक्कम उचलण्याकरिता मा. मुंबई उच्च न्यायालयाकडेच अर्ज करावयाचा आहे व मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशाशिवाय हे न्यायालय रक्कम उचलण्याची परवानगी देवू शकत नाही.

3. नि.क्र.२२ वरील सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर यांच्या अहवालानुसार हातातील दरखास्तीमध्ये सि.नं.१०५ अन्वये दिनांक १३/०३/२०२५ रोजी रक्कम रुपये ४१,६६,९१६/- जमा आहे. तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयाचा प्रथम अपिल क्र. ३२७९२/२०२३ मधील अंतरिम अर्ज क्र.१०९७/२०२५ वरील दिनांक २४/०१/२०२५ रोजीचा आदेश दप्तरी दाखल आहे. सदर आदेशातील कलम ५ प्रमाणे रक्कम उचलण्याकरिता या न्यायालयाकडे अर्ज करावा असे निर्देश दिलेले नाहीत. मा. मुंबई उच्च न्यायालयाकडे अपिल प्रलंबित असल्यामुळे व धनकोला रक्कम अदा करण्याचे निर्देश मा. मुंबई उच्च न्यायालयाने या न्यायालयाला दिलेले नसल्यामुळे अर्ज मंजूर करता येणार नाही. करिता धनकोचा नि.क्र. २२ अन्वयेचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by REVATI MALLIKARJUN KANTE
Date: 2025.07.19 15:50:45 +0530

दिनांक – १८/०७/२०२५

**( रेवती म. कंटे )**
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
बार्शी.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | | |
|---|---|---|---|
| a) | Name of the Stenographer | : | G.L. Sutar, Steno. Grade-2 |
| b) | Court | : | Jt. C.J.S.D. and A.C.J.M., Barshi. |
| c) | Date of Judgment/Order | : | 18.07.2025 |
| d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 19.07.2025 |
| e) | Judgment/Order uploaded on | : | 19.07.2025 |